# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.५

सभावृत्तांत

दिनांक ०१/०७/२०१६ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुलै २०१६ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०१/०७/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. टाक अरुण मदन | सभापती |
| २. | मा. वाघेरे सुनिता राजेश | सदस्य |
| ३. | मा. श्री. ताम्हणकर प्रमोद रघुनाथ | सदस्य |
| ४. | मा. पाडाळे निता विलास | सदस्या |
| ५. | मा. श्री. नढे विनोद जयवंत | सदस्य |
| ६. | मा. तापकीर अनिता मच्छिंद्र | सदस्या |
| ७. | मा. चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ८. | मा. श्री. बोकड रामदास गेणभाऊ | सदस्य |
| ९. | मा. श्रीमती जवळकर वैशाली राहुल | सदस्या |
| १०. | मा. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रीय अधिकारी, मा.विजय वाघमारे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, एल.बी. जाधव, मा. विनय ओहोळ, मा. शिरीष पोरेडी, उपअभियंता, स्थापत्य,मा. रामनाथ टकले, उपअभियंता ,बांधकाम परवानगी, मा. वैभव पुसाळकर, उपअभियंता, स्थापत्य उद्यान, मा. रवींद्र पवार, उपअभियंता, जलनि:सारण, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. राजेंद्र इंगळे, उपअभियंता, झोनिपू, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा. इ.के. कलाल, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा.बी.जे. मोरे, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य उद्यान, मा. वाकोडे ए.एस.,मा. रोकडे जयवंत, मा. मुलाणी बी.एम. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. संजय चव्हाण, मा. आर.बी. जगताप, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. निलेश दाते, मा. संदीप पाडवी, मा. शरद मोरमारे, मा. अमिन दिक्षीत, मा. साकेत पावरा. कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. एम.टी. शिनगारे, उपलेखापाल, मा. आर.एम. सौदाई,

मा. संदीप कोतवडेकर, मा. सरोदे वसंत, आरोग्य निरीक्षक, मा. अमर मद्रासी, मलेरिया निरीक्षक, मा. एस.डी. माळी, आरोग्य निरीक्षक, पशू वैद्यकीय विभागमा. चंद्रकांत मोरे, हॉर्टीकल्चर सुपरवायझर, मा. सुनिल दुदुसकर, सटाले , उद्यान सहाय्यक, मा. एस.व्ही. खरात, मा. सुहास शिंदे, सर्व्हेअर, नगररचना मा. मोहन कदम, मा. एम.पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

सन्मा. सदस्य यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १ :** प्रभाग क्र. ५४ विशालनगर पिंपळे निलख गणेशनगर बस स्टॉप जवळील सद्यस्थितीत असलेली मुतारी ही वापरास पुरेशी नाही तसेच या मुतारीचा स्त्रियांना काहीच उपयोग होत नाही. याचबरोबर मुतारीची अवस्था अत्यंत खराब असल्याने तेथे दुर्गंधी व अस्वच्छता मोठया प्रमाणावर वाढलेली असल्याने ही मुतारी पाडण्यात यावी व तेथे स्त्री व पुरुष यांच्यासाठी वेगवेगळी सोय असलेली टॉयलेट ब्लॉक बांधणे

**विषय क्र. २ :** ड क्षेत्रीय कार्यालयाकडील “प्रवास भत्ता” या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी र.रु. २५०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली होती. सदर तरतुदीतुन माहे जुन २०१६ अखेर र.रु. २३,१९०/- इतका खर्च झालेला असुन र.रु. १८१०/- शिल्लक आहे. क्षेत्रीय अधिकारी श्री. चंद्रकांत खोसे हे मा. आयुक्त सो. यांचे आदेशानुसार स्वच्छ भारत अभियानांतर्गत दिनांक १९ मे २०१६ रोजी बंगळुरु महानगरपालिका येथे झालेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहिले होते. त्यांना सदर प्रशिक्षणासाठी अंदाजे र.रु. २००००/- प्रवास खर्च झालेला आहे. सदर प्रवास खर्चाची प्रतिपुर्ती करणेसाठी ड क्षेत्रीय कार्यालयाकडील “प्रवास भत्ता” या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणे आवश्यक असल्याने ड क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाकडील कार्यालयीन आकस्मिक खर्च परिशिष्ट ब मधील “प्रभाग समिती प्रवास खर्च” या लेखाशिर्षातुन र.रु. ५०,०००/- इतकी तरतूद ड क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाकडील “प्रवास भत्ता” या लेखाशिर्षावर वर्ग करणेबाबतचा क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील प्रस्ताव

**विषय क्र.** ३ पिंपरी प्रभाग क्र. ४३ पिंपरी येथील सम्राट अशोक चौकाजवळील पुनर्वसन प्रकल्प टप्पा क्र. २ येथील वसाहतीस “लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज वसाहत” व पिंपरी येथील जिजामाता रुग्णालयाजवळील बसथांब्यास “लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज” असे नामकरण करणेबाबत

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे जुलै २०१६ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ४ माहे जुन २०१६ च्या मासिक सभेच्या दिनांक १७/०६/२०१६ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील कार्यपत्रिका क्र. ४ माहे जुन २०१६ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

माहे जुन २०१६ च्या कार्यपत्रिका क्र. ५ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र.१०

दिनांक १/७/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

संदर्भ : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर यांचेकडील दि. १७/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४७ मधील सर्व्हे नं. ७३/२ई/१५ मधील साईसदन अपार्टमेंट व मयुर रेसिडेन्सी यामध्ये ९ मीटरपेक्षा अंतर जास्त असल्यामुळे कलम ३७ अंतर्गत रस्ता हलवणेचा प्रस्ताव तहकुब करण्यात येत आहे.

--------------

विषय क्र. २ ठराव क्र. ११

दिनांक १/७/२०१६ विभाग: आरोग्य विभाग

संदर्भ : ड क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. डक्षे/०९/कावि/८७४/२०१६दि. १७/६/२०१६

ड क्षेत्रीय कार्यालय आरोग्य विभागाकडील “अस्थायी अस्थापना” या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी र.रु. ५००००/- तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीतुन स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय बांधकाम अनुदानाचे अर्ज संगणकावर अपलोड करणेकामी नेमणुक केलेल्या दोन कोपा/पासा कर्मचा-यांचे विद्यावेतन अदा करण्यात येत आहे. आतापर्यंत त्यांचे विद्यावेतनापोटी र.रु. ३९६६२/- इतकी रक्कम खर्ची पडली असुन र.रु. १०३३८/- तरतुद शिल्लक आहे. सदर कर्मचा-यांचे माहे डिसेंबर २०१६ अखेर पर्यंतचे विद्यावेतन अदा करणेकामी “स्थायी अस्थापना” या लेखाशिर्षावरुन र.रु. १,५०,०००/- तरतुद “अस्थायी अस्थापना” या लेखाशिर्षावर वर्ग करणे तसेच “प्रवास भत्ता” या लेखाशिर्षामध्ये असलेली र.रु. १०,०००/- तरतुद सहाय्यक आरोग्याधिकारी यांचे ३ दिवसांचे कार्यशाळेसाठी म्हैसुर (कर्नाटक ) येथे प्रशिक्षणास जाणे-येणेचे भाडे व दैनिक भत्ता अदा करणेकामी कमी पडत असलेचे कारणास्तव “स्थायी अस्थापना” या लेखाशिर्षावरुन र.रु. ४०,०००/- तरतुद “प्रवास भत्ता” या लेखाशिर्षावर वर्ग करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-----------------

**मा. सचिव, सभा शाखा** : सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक १/७/२०१६ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. ३ ठराव क्र. १२

दिनांक १/७२०१६ विभाग: स्थापत्य

सूचक : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर अनुमोदक : मा. वैशाली राहुल जवळकर

संदर्भ : मा. आरती सुरेश चोंधे यांचेकडील दिनांक २८/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५४ विशालनगर पिंपळे निलख गणेशनगर बस स्टॉप जवळील सद्यस्थितीत असलेली मुतारी ही वापरास पुरेशी नाही तसेच या मुतारीचा स्त्रियांना काहीच उपयोग होत नाही. याचबरोबर मुतारीची अवस्था अत्यंत खराब असल्याने तेथे दुर्गंधी व अस्वच्छता मोठया प्रमाणावर वाढलेली असल्याने ही मुतारी पाडण्यात यावी व तेथे स्त्री व पुरुष यांच्यासाठी वेगवेगळी सोय असलेली टॉयलेट ब्लॉक बांधणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ४ ठराव क्र.१३

दिनांक १/७२०१६ विभाग: प्रशासन

सूचक : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर अनुमोदक : मा. वैशाली राहुल जवळकर

संदर्भ : मा. ड क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. डक्षे/०१/कावि/५७१/२०१६दि.३०/६/२०१६

ड क्षेत्रीय कार्यालयाकडील “प्रवास भत्ता” या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी र.रु. २५०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली होती. सदर तरतुदीतुन माहे जुन २०१६ अखेर र.रु. २३,१९०/- इतका खर्च झालेला असुन र.रु. १८१०/- शिल्लक आहे. क्षेत्रीय अधिकारी श्री. चंद्रकांत खोसे हे मा. आयुक्त सो. यांचे आदेशानुसार स्वच्छ भारत अभियानांतर्गत दिनांक १९ मे २०१६ रोजी बंगळुरु महानगरपालिका येथे झालेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहिले होते. त्यांना सदर प्रशिक्षणासाठी अंदाजे र.रु. २००००/- प्रवास खर्च झालेला आहे. सदर प्रवास खर्चाची प्रतिपुर्ती करणेसाठी ड क्षेत्रीय कार्यालयाकडील “प्रवास भत्ता” या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणे आवश्यक असल्याने ड क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाकडील कार्यालयीन आकस्मिक खर्च परिशिष्ट ब मधील “प्रभाग समिती प्रवास खर्च” या लेखाशिर्षातुन र.रु. ५०,०००/- इतकी तरतूद ड क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाकडील “प्रवास भत्ता” या लेखाशिर्षावर वर्ग करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-----------------

विषय क्र. ५ ठराव क्र.१४

दिनांक १/७२०१६ विभाग: स्थापत्य

सूचक : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर अनुमोदक : मा. वैशाली राहुल जवळकर

संदर्भ : मा. अरुण मदन टाक यांचेकडील दिनांक ०१/०७/२०१६ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी प्रभाग क्र. ४३ पिंपरी येथील सम्राट अशोक चौकाजवळील पुनर्वसन प्रकल्प टप्पा क्र. २ येथील वसाहतीस “लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज वसाहत” व पिंपरी येथील जिजामाता रुग्णालयाजवळील बसथांब्यास “लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज” असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-----------------

यानंतर मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. नगरसदस्य यांनी विविध विभागांचे कामकाजास अनुसरुन खालील प्रमाणे मत व्यक्त केले.

<u>**स्थापत्य विभाग**</u> :-

**मा. वैशाली राहुल जवळकर**:- प्रभाग क्र. ५६ वैदुवस्ती मध्ये सृष्टी चौक ते बीआरटी मुख्य रस्त्यापर्यंत जाणा-या १८ मीटर रस्त्याला श्रीकृष्ण मंदीर मुख्य रस्ता असे नामकरण करणेचा प्रस्ताव सादर केला आहे .त्यावर मा. सदस्य श्री. बोकड यांनी सदर नामकरणाचा ठराव या पूर्वीच झालेला असल्याचे यांनी सांगितले. परंतु सदर ठिकाणी नामफलकाचे बोर्ड बसविले नाही.

**मा. शिरीष पोरेडी उपअभियंता स्थापत्य**:- सदर बोर्ड तयार करुन तेथे बसविण्यात येतील.

**मा. सुनिता वाघेरे** : स्टॉम वॉटर चेंबर बसविण्याची कार्यवाही करावी. जिजामाता हॉस्पिटल परिसर या ठिकाणी रस्त्याला खड्डे झाले आहेत.

**मा. नीता विलास पाडाळे** : वॉर्ड क्र. ४७ येथील स्टॉर्म वॉटर चेंबरचे काम आठ दिवसापासुन प्रलंबित आहे. श्री. लोखंडे, कनिष्ठ अभियंता यांनी तातडीने काम करुन घेणेत येत आहे असे सांगितले. गुरुकृपा कॉलनी येथे पेव्हर ब्लॉक खचले आहेत ते पुन्हा बसविणेत यावेत.

**मा. राजेंद्र जगताप** : स्थापत्य विभागाचे ठेकेदार काम करतात परंतु राडारोडा तसाच टाकून जातात . त्यांना स्थापत्य विभागाकडून सक्त सूचना देणेत याव्यात. सदर विषयास मा. सभापती श्री. टाक यांनी अनुमोदन दिले.

**मा. विनोद नढे** : प्रभाग क्र. ४७ मधील १८ मीटर रस्त्यासाठी जेवढा रस्ता ताब्यात आहे तो विकसित करावा तसेच तेथे राडारोडा पडला आहे तो उचलण्यात यावा.

<u>**पाणीपुरवठा विभाग**</u> :-

मा. निता विलास पाडाळे :- मागील चार ड प्रभाग समिती बैठकींना कार्यकारी अभियंता श्री. रामदास तांबे उपस्थित नाहीत तसेच उपअभियंता यांचेकडून कार्यवाही करण्यात येत नाही. क्रांतीवीर कॉलनी स्वराज कॉलनी,परमवीर कॉलनी, फिनोलेक्स कॉलनी येथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे.दुषित पाणीपुरवठाही होत आहे. परमवीर कॉलनी येथील व्हॉल्व्ह सापडत नाही. पाणीपुरवठा विभागाचे अधिका-यांनी पाणीपुरवठयाचे प्रश्न तातडीने सोडवावेत व पाणी प्रेशरने द्यावे.

**उपअभियंता श्री. साबळे** :क्रांतीवीर कॉलनी, स्वराज कॉलनी येथे झोनिंग करुन पाणीदिले आहे.

**मा. सभापती** : संबंधित उपअभियंता यांनी समक्ष भेट देऊन तक्रारींचे निराकरण करावे.

**मा. राजेंद्र जगताप** : पाणीपुरवठा विभागाकडील नळकनेक्शनसाठी नागरी सुविधा केंद्रामार्फत अर्ज स्वीकारले जातात. सदर अर्ज नागरी सुविधा केंद्राकडून तातडीने पाणीपुरवठा विभागाकडे पाठविण्यात येत नाही तसेच संबंधित प्लंबर, मीटर निरीक्षक यांचेकडून नळकनेक्शनचे प्रकरण प्रलंबित ठेवणेत येते. २०१४, २०१५, २०१६ चे नळकनेक्शनची प्रकरणे प्रलंबित आहेत. संबंधित नागरी सुविधा केंद्राला प्रकरणे सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन घेणेबाबत लेखी स्वरुपात कळवावे.

**मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता पाणीपुरवठा** : सदर प्रकरणी पाठपुरावा करुन कार्यवाही करुन घेणेत येईल.

**<u>जलनि:सारण विभाग</u>** :

**मा. राजेंद्र जगताप** :- जलनि:सारण विभागाकडील सक्शनच्या गाडयांचे कामकाज व्यवस्थित नाही.

**उपअभियंता जलनि:सारण श्री. पवार** : नवीन ठेकेदाराची नेमणुक करण्यात आली आहे. त्यांचेकडून व्यवस्थित काम करुन घेणेत येईल.

**मा. अरुण मदन टाक** : जायका हॉटेल येथे चेंबर ब्लॉक झाले असुन त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

**<u>आरोग्य विभाग</u>** :

**मा. रामदास बोकड** : मागील वर्षी शौचालय पाडणेबाबत ठराव पारीत करण्यात आला असुन त्यावर अद्याप संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**मा. शिरीष पोरेडी, उपअभियंता, स्थापत्य** : कार्यवाही करण्यात येईल.

**<u>एमएसईडीसीएल यांचेकडील भूमिगत केबलचे कामाबाबत</u>**

**मा. रामदास बोकड** : ऑफिसच्या मागील बाजूस महापालिकेचा विद्युत असुन तो पोल धोकादायक व गंजलेल्या अवस्थेत आहे.त्यावरुन २०-२५ अनधिकृत कनेक्शन करण्यात आली आहेत. तो पोल हलविणेबाबतची कार्यवाही गेल्या ६ महिन्यापासुन प्रलंबित आहे. तसेच भूमिगत केबलचे कामासाठी मे. बीव्हीजी इंडिया प्रा. लि. यांनी काम स्वीकारले असुन ते मनमानीपणे काम करीत आहेत. अनावश्यक ठिकाणी काम करीत आहेत. परवानगी नसताना रस्ता खोदाईचे काम करतात. सद्यस्थितीत तेथे स्टॉर्म वॉटर चेंबरचे व ड्रेनेजचे काम सुरु असुन तेथे भूमिगत केबलचे कामासाठी खोदाई करुन कार्यवाही करता येईल.

**मा. कांदे, एमएसईडीसीएल** : स्थापत्य विभागाकडे आवश्यक ते पैसे भरले असुन परवानगी मिळालेली नाही. पावसाळयाच्या कालवधीत रस्ते खोदाईसाठी परवानगी बंद असते. सदर पोल मनपाचा स्ट्रीट लाईटचा आहे. महापालिकेची परवानगी नाही त्यामुळे तेथील काम करता येत नाही.

**मा. पोरेडी, उपअभियंता स्थापत्य** : सदर कामासाठी आवश्यक असलेल्या खोदाईसाठी मे. बीव्हीजी इंडिया यांनी परवानगी मिळणेकामी अर्ज करावा त्यास महापालिका परवानगी देईल. यास मा. रामदास बोकड यांनीही संमती दिली.

**मा. सुनिता वाघेरे** : बाल गोपाळ शाळेजवळ महावितरणकडून विद्युत वायर्स लोंबकळत असल्याचे दिसुन येते. सदर ठिकाणी मुले खेळत असतात तेथे अपघाताचा धोका संभवतो. सदर बाबत एमएसईडीसीएलचे संबंधित अधिकारी श्री. खडककर यांचेशी संपर्क साधला परंतु अद्याप त्यांचेकडून तातडीने कार्यवाही झालेली नाही.

**<u>आरोग्य विभाग</u>** :

**मा. वैशाली राहुल जवळकर** : कचरा गाडयांचे नियोजन व झाडूवाले यांचे बाबत वारंवार कळविले आहे. परंतु अद्याप तक्रारीवर कार्यवाही करण्यात आलेली नाही. यास मा. रामदास बोकड यांनी संमती दिली. कचरा गाडयांचे ठेकेदार यांचे काम व्यवस्थित नाही. ते वाहनचालक व कर्मचारी पुरवत नाही व त्यांचे वाहनचालक, कर्मचारी हे कामकाजाबाबत उदासीन आहेत. सदर ठेकेदारास मुदतवाढ देऊ नये.

**मा. रामदास बोकड** : महालक्ष्मी गार्डन ते मस्जिद या परिसरात कचराकुंडीची आवश्यकता नसताना तेथे कचराकुंडी ठेवण्याचे प्रयोजन योग्य वाटत नाही. त्याऐवजी कचरा गाडयांचे नियोजन व ठेकेदारांकडून काम करुन घेण्यासाठी प्रशासनाने योग्य कार्यवाही करावी.

**मा. सुनिता वाघेरे** : कचरा गोळा करण्यासाठी ज्या परिसरात मोठी गाडी जात नाही त्या ठिकाणी छोटी गाडी पाठवणेत येते परंतु कचरा गोळा करण्यासाठी छोटया गाडयांना बकेट तातडीने देणेत याव्यात कारण सदर ठिकाणचे कर्मचारी पोत्यात कचरा गोळा करतात. आरोग्य विभागाचे कर्मचारी यांचे आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.किंवा घंटागाडीची सोय करण्यात यावी.

**मा. विनोद नढे** : डॉ. जगदाळे हॉस्पिटलचे आवारात पाणी साचत असलेबाबतच्या विषयावर मागील बैठकीत मुद्दा मांडला होता.

**मा. रामनाथ टकले, उपअभियंता , बांधकाम परवानगी** : संबंधितांना पाणी काढून घेणेबाबत सूचना दिल्या असुन वॉटर प्रुफींगचे काम करुन घेणेबाबतही सूचना दिल्या आहेत.

**<u>प्रशासन विभाग</u>**:

**मा. वैशाली जवळकर** : वैदूवस्ती येथील नागरी सुविधा केंद्र बंद करावे. तेथे नागरीकांना महापालिकेकडून नागरीकांसाठी पुरविण्यात येणा-या विविध योजनांबाबतची माहिती मिळत नाही. तेथील कर्मचा-यांचे काम व्यवस्थित नाही तरी सदर नागरी सुविधा केंद्र ड क्षेत्रीय कार्यालय येथे सुरु करण्यात यावे.

**मा. राजेंद्र जगताप** : नागरी सुविधा केंद्रात कोणतेही अर्ज सादर करण्यापूर्वी सर्व कागदपत्रांची पुर्तता झालेले अर्ज घेणेत येणेकामी सूचना देणेत याव्या. सन २०१४ पासुन अनधिकृत नळकनेक्शनची प्रकरणे प्रलंबित आहेत.

**मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री. खोसे** :आपल्या मागणीनुसार वैदूवस्ती येथील नागरी सुविधा केंद्र बंद करणेबाबत संबंधित विभागास पत्र पाठविणेत येईल.

**अतिक्रमण विभाग** :

**मा. अनिता मच्छिंद्र तापकीर** :

अतिक्रमण विभागाने अनधिकृत हातगाडया व फ्लेक्सवर कारवाई प्रभावीपणे करावी.

**मा. रामदास बोकड** : हॉकर्स झोनचे काम अद्याप पूर्ण नाही. त्यामुळे सृष्टी चौक येथे नागरीकांना चालण्यासाठी रस्ता नाही. तसेच कासारवाडी, भोसरी व इतर भागातील हातगाडीवाले व पथारीवाले तेथे येऊन रस्त्यावर अतिक्रमण करतात. त्यामुळे हॉकर्स झोनची अंतिम कार्यवाही लवकरात लवकर करावी. तसेच बस स्टॉपवर छोटे छोटे फ्लेक्स लावण्यात येत आहेत.

**मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे** : महापालिकेच्या डीआयटी विभागाकडून व भूमि जिंदगी विभागाकडून हॉकर्स झोनचा विषय मा. महापालिका सभेपुढे सादर करण्यात आला आहे. मा. महापालिका सभेच्या मान्यतेनंतर त्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात येईल.

**पशू वैद्यकीय विभाग** :

**मा. सभापती श्री. टाक** : डुकरांचा प्रादुर्भाव खूप आहे. डॉ. गोरे, पशू वैद्यकीय विभाग हे बैठकीस उपस्थित नसल्याबाबत मा. सभापती यांनी नाराजी व्यक्त केली.

**मा. आरोग्य निरीक्षक श्री. माळी** : कामातील व्यस्ततेमुळे डॉ. गोरे बैठकीस आले नाहीत. पशू वैद्यकीय विभागाकडून निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु त्यास प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याची मुदत ४ जुलै अखेर आहे. त्यास प्रतिसाद न मिळाल्यास संस्थेस काम देणेबाबतची निविदा प्रसिध्द करण्यात येईल.

**मा. सभापती** :- सर्व उपस्थित अधिकारी यांनी सन्मा. नगरसदस्य यांनी दिलेल्या सूचनांनवर आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सूचना देऊन, सर्व सन्मा. नगरसदस्य व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन माहे जुलै २०१६ ची बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-
( अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती, ड क्षेत्रीय कार्यालय,
रहाटणी - १७

सही/-
(विजय वाघमारे)
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२६१/२०१६
दिनांक – ११ /०७/२०१६